**एक दिवस..**

कविता होण्याचा एक दिवस..
गझल गाण्याचा एक दिवस..

खळखळून हसण्याचा एक दिवस..
पाण्यात पाय सोडून बसण्याचा एक दिवस..

पावसात भिजण्याचा एक दिवस..
जळून नंतर विझण्याचा एक दिवस...

आकाशात भरारण्याचा एक दिवस..
वीजेवर थरारण्याचा एक दिवस...

तुला छळण्याचा एक दिवस..
स्वत:च अश्रु ढाळण्याचा एक दिवस..

सगळं-सगळं कळण्याचा एक दिवस..
असं कळूनही न वळण्य़ाचा एक दिवस !!

**- प्रीती देशपांडे**
**www.meetipreeti.com**